SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004 MAHARASHTRA
PHONE: EPBX - 2609000 FAX:0091-0231-2691533 & 0091-0231-692333
DLL 02312609091,2609135 Website : www.unishivaji.ac.inE-mail :affiliation.t2@unishivaji.ac.in
Website Conduit : (1) Affiliation→Affiliation T2 Circulars(2) Affiliation →Affiliation T2 Information Lists
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४ महाराष्ट्र
दूरध्वनी ईपीबीएक्स- २६०९०००, फॅक्स ००९१०२३१२६९१५३३ व ००९१०२३१६९२३३३
संलग्नता टी २ विभाग थेट दूरध्वनी क्र. ०२३१ २६०९०९१,२६०९१३५

Estd. 1962
"A++" Accredited
by NAAC(2021)
With CGPA 3.52

संदर्भ क्र./संलग्नता/टी-२/शासन टे./ No 2 4 1 3 दि. 13 JUN 2025

## : परिपत्रक :

प्रति,
मा. प्राचार्य / संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये/संस्था
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

विषय :- शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना राबविणेबाबत.
संदर्भ :- महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्या., मुंबई या कार्यालयाचे अ.शा.क्रमांक इमाविवि-२०२५/शैकयो/२७८, दि.२६/०५/२०२५ रोजीचे पत्र.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय व संदर्भिय पत्रास अनुसरुन आपणांस आदेशान्वये कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्या., मुंबई (महाराष्ट्र शासनाचा उपक्रम) या पत्राच्या अनुषंगाने आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थी व विद्यार्थीनीना या योजनेचा लाभ घेता यावा याकरिता या योजनाचे माहिती पत्रक सोबत पाठविले आहे. तरी सदर पत्रानुसार पुढील कार्यवाही करावी.

कळावे,

आपला विश्वासू,
डॉ. पी. एस. पांडव
उपकुलसचिव
संलग्नता टी-२ विभाग

सोबत - पत्र जोडले आहे.

रविंद्र.रा.पेटकर

व्यवस्थापकीय संचालक

**महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्या.**
(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)
मुख्य कार्यालय : प्रशासकीय भवन, ४ था मजला, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर, मुंबई - ४०० ०७१.
दूरध्वनी : ०२२-२५२७५३७४/२५२११६८५
ई-मेल : mdmsobcfdc@gmail.com
वेबसाईट : www.msobcfdc.org

अ.शा.क्रमांक इमाविवि-२०२५/शैकयो/ २७८
दिनांक — २६.०५.२०२५

आदरणीय महोदय,

महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्या., मुंबई हे शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत कार्यरत आहे, या महामंडळामार्फत इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थी / विद्यार्थीनींच्या शैक्षणिक हिताच्या दृष्टीकोनातून उच्च शिक्षणासाठी कर्जावरील व्याज उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने "शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना" राबविण्यात येत आहे.

राज्य, देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय केंद्रीय परिषद, कृषी विद्यापीठ परिषद, शासकीय अनुदानित व खाजगी मान्यताप्राप्त (NAAC मानांकन प्राप्त) DEEMED विद्यापिठ शैक्षणिक संस्थेत अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्राप्त इतर मागासवर्ग प्रवर्गातील विद्यार्थी / विद्यार्थीनींना उच्च शिक्षणाकरीता सदर योजना लागू असेल.

सदर योजनेंतर्गत आरोग्य विज्ञान, अभियांत्रिकी, व्यावसायिक व व्यवस्थापन, कृषी, अन्नप्रक्रिया व पशुविज्ञान इ. अभ्यासक्रमासाठी निवड झालेले विद्यार्थी / विद्यार्थीनी पात्र असतील.

शैक्षणिक अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत बँकेमार्फत अर्जदारास वितरीत केलेल्या कर्ज रक्कमेवरील व्याजाची नियमित परतफेड केलेल्या अर्जदारास केवळ व्याजाचा १२% पर्यंतचा परतावा महामंडळामार्फत आधारसंलग्न बँक खात्यात वर्ग करण्यात येईल.

आपल्या अखत्यारितील महाविद्यालयीन प्राचार्यांना त्यांच्या संस्थेत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थी / विद्यार्थीनींना सदर योजनेचा लाभ घेता यावा याकरीता योजनेचे माहिती पत्रक यासोबत पाठवित आहोत. सदर माहिती पत्रक महाविद्यालयाच्या सुचना फलकावर प्रसिद्ध करणेबाबत तसेच योजनेची माहिती समुपदेशनाद्वारे देण्याबाबत आपल्या स्तरावरुन संबंधित प्राचार्यांना निर्देशित करण्याची विनंती आहे.

आपला,

(रविंद्र.रा.पेटकर)
व्यवस्थापकीय संचालक

प्रति,
डॉ.दिगंबर शिर्के,
मा.कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर — ४१६ ००४.

प्रत,
मा.कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर — ४१६ ००४.

# महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्या.,मुंबई.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | योजनेचे नांव | : | **शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना** |
| २. | उद्देश | :<br>: | १. इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक, आर्थिकदृष्टया सक्षम करणे व त्यांना उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहित करणे.<br>२. राज्य, देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या इमाव प्रवर्गातील विद्यार्थीना उच्च शिक्षणाकरीता बँकेमार्फत मंजुर केलेल्या रु.२०.०० लक्षपर्यंत कर्ज रक्कमेवरील व्याज परतावा महामंडळाकडुन वितरीत केला जाईल. |
| ३. | योजनेचे स्वरुप | :<br>: | १. राज्यांतर्गत व देशांतर्गत अभ्यासक्रमासाठी महत्तम कर्ज मर्यादा रु.१०.०० लक्ष'<br>२. परदेशी अभ्यासक्रमासाठी महत्तम कर्ज मर्यादा रु.२०.०० लक्ष |
| ४. | लाभार्थीच्या पात्रतेच्या अटी व शर्ती | :<br>: | १. अर्जदाराचे वय १७ ते ३० वर्षे असावे व तो इमाव प्रवर्गातील, महाराष्ट्राचा रहिवाशी असावा.<br>२. अर्जदाराची कौटुंबिक वार्षिक उत्पन्न मर्यादा रु.८.०० लक्ष पर्यंत व नॉन क्रिमिलेअरच्या मर्यादेत.<br>३. अर्जदार इयत्ता १२ वी ६०% गुणांसह उत्तीर्ण असावा तसेच पदवीच्या द्वितीय वर्ष व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणारे विद्यार्थी ६०% गुणांसह **पदवीका** (Diploma) उत्तीर्ण असावेत.<br>४. पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी किमान ६०% गुणांसह **पदवी** उत्तीर्ण असावा.<br>५. राज्य व देशांतर्गत अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्याकरीता शैक्षणिक शुल्क, पुस्तके, साहित्य खरेदी व अर्जदाराच्या राहण्याचा व भोजनाचा खर्च समावेश राहील.<br>६. परदेशी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्याकरीता फक्त शैक्षणिक शुल्क, पुस्तके, साहित्य खरेदीचा समावेश राहील.<br>७. अर्जदाराचा सिबील क्रेडिट स्कोअर ०, -१ (म्हणजेच यापुर्वी त्याने कर्ज घेतलेले नसावे) किंवा ५०० पेक्षा जास्त असावा. |
| ५. | व्याजाचा परतावा | :<br>: | महामंडळ केवळ बँकेकडुन वितरीत केलेल्या रक्कमेवरील जास्तीत जास्त १२% पर्यंत रक्कमेचा व्याज परतावा नियमित परतफेड करणाऱ्या लाभार्थीस अदा करेल. व्याज परतावासाठी जास्तीत जास्त ५ वर्ष कालावधी ग्राह्य धरण्यात येईल. |
| ६. | कर्ज प्रस्तावा सोबत अपलोड करावयाची कागदपत्रे | :<br>: | १. अर्जदाराचा इतर मागास प्रवर्गातील जातीचा दाखला, २. उत्पन्नाचा दाखला ३. महाराष्ट्राचा रहिवाशी दाखला. (Domicile) ४. अर्जदार व अर्जदाराचे पालक यांचे आधार कार्ड (Front & Backside). ५. ज्या अभ्यासक्रमाकरीता शैक्षणिक कर्ज आवश्यक आहे त्या अभ्यासक्रमासाठीची पात्रता परीक्षा उत्तीर्ण झाल्याची गुणपत्रिका. ६. अर्जदार व अर्जदाराचे पालक यांचे पासपोर्ट आकारातील फोटो, ७. अर्जदाराचा जन्माचा / वयाचा दाखला.८. शैक्षणिक शुल्क संबंधित पत्र ९. शिष्यवृत्ती (Scholarship), शैक्षणिक शुल्कमाफी (Freeship) पात्रतेबाबतचे प्रमाणपत्र.१०. मान्यताप्राप्त संस्थेत प्रवेश घेतल्याचा पुरावा.११. आधार संलग्न बँक खाते पुरावा. १२. महामंडळ वेबसाईडचा पत्ता www.msobcfdc.in |
| ७. | अभ्यासक्रम | :<br>: | अ. <u>राज्यांतर्गत व देशांतर्गत अभ्यासक्रम :-</u> केंद्रीय परिषद, कृषी विद्यापीठ परिषद, शासकीय अनुदानित व खाजगी मान्यताप्राप्त (<u>NAAC मानांकन प्राप्त</u>) शैक्षणिक संस्थेत अभ्यासक्रमासाठी शासनमान्य सामाईक पात्रता परीक्षा उत्तीर्ण झालेल्या व त्यानुसार प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी -<br>ब. <u>परदेशी अभ्यासक्रम (Foreign Education):-</u><br>१. परदेशी अभ्यासक्रमासाठी QS (Quacquarelli Symonds) च्या रँकिंग / गुणवत्ता, पात्रता परीक्षा Graduate Record Exam (GRE), Test of English as a Foreign Language (TOEFL) उत्तीर्ण झालेले विद्यार्थी. |